**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक २८ जुलै २०२५**

**ठळक बातम्या**

1. **नागपूरची १९ वर्षीय दिव्या देशमुख बनली बुद्धिबळ विश्वविजेती.**
2. **भाजप निवडणुकीसाठी कायम तयार, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या दृष्टीने आज वर्धा इथं आयोजित बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा विश्वास.**
3. **ऑपरेशन सिंदूर केवळ स्थगित केलेलं असून पाकिस्तानने भविष्यात कोणतीही आगळीक केली, तर ते पुन्हा सुरू होईल, अशी संरक्षणमंत्र्यांची लोकसभेत ग्वाही.**
4. **अप्र आधारित रिक्षा-टक्सी आणि ई-बाईक सेवा आता सरकारकडून - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती.**

---

फिडे बुद्धिबळ

जॉर्जियातील बटुमी इथं खेळल्या गेलेल्या 2025 च्या FIDE बुद्धिबळ विश्वचषकात, नागपूरच्या दिव्या देशमुखनं अखेर विश्वचषक विजेतेपद जिंकलं. विशेष म्हणजे तिनं आपल्याच देशाचा कोनेरु हम्पीचा पराभव केला. दोन्ही खेळाडूंमधील क्लासिकल सामने अनिर्णित राहिले. आज २०२५ च्या FIDE महिला विश्वचषकात विजय मिळवून दिव्या देशमुख ग्रँडमास्टरचा किताब मिळवणारी चौथी भारतीय महिला ठरली. विजया नंतर दिव्याने आपली प्रतिक्रिया दिली आहे -

***(होल्ड बाईट- दिव्या देशमुख)***

***I think it was fate me getting the grandmaster title this this way because before this I didn't even have one nom and now before this tournament I was thinking oh where can I get my nom and now I am a Grandmaster.***

शनिवार आणि रविवारी झालेल्या क्लासिकल सामन्यात ग्रँडमास्टर कोनेरु हम्पीनं नवीन बुद्धिबळ स्टार दिव्या देशमुखला आघाडी मिळवू दिली नाही. क्लासिकल सामना 1-1 गुणांनी बरोबरीत सुटला होता. दरम्यान, नागपूर चेस असोसिएशनचे कार्यकारी अध्यक्ष सचेत सोमण यांनी दिव्याच्या विजयाबद्दल आनंद व्यक्त केला आहे -

***(होल्ड बाईट - सचेत सोमण)***

*नागपुरची  जी गोल्डन गर्ल आहे. तिने जो विन मिळलेला आहे. एक अतिशय एक्सपिरिअन्स कोनेरू हंपी बरोबर. त्याचबरोबर तिला ग्रँडमास्टर टाइटल पण या विनच्या निमित्ताने मिळालेला आहे. ती पण एक महत्त्वाची एक लँडमार्क अचीवमेंट आहे. दोघंही आपल्या आपल्या रिस्क न घेता समोर क्लासिकलमध्ये दोन्ही ड्रॉ झाल्या पहिल्या रपिडमध्ये पण थोडी रिस्क घेतल्या गेली पण अगदी खूप रिस्क नाही घेतल्या गेली. पण सेकंड  जो डिसाइडर गेम आहे. त्याच्यामध्ये दोघांनी रिस्क घेतली आणि शेवटी एंड गेममध्ये दिव्याने चांगला विन काढला एन्ड गेममध्ये नेऊन.*

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिव्याचे अभिनंदन केले आहे.

---------------------------------------------

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

भाजप निवडणुकीसाठी कायम तयार असते असे सांगून  स्थानिक स्वराज्य संस्थांच्या दृष्टीने आज वर्धा येथे आयोजित करण्यात आलेल्या मेळाव्यात दिशा निर्देश देण्यात आल्याची माहिती ज्येष्ठ भाजपा नेते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. वर्धा जिल्ह्याच्या सेवाग्राम रोड स्थित चरखागृह इथ  आज  स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने भारतीय जनता पार्टी विदर्भ विभागाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मुख्यमंत्री देवेन्द्र फडणविस, मंत्री अशोक उईके, मंत्री आकाश फुंडकर, मंत्री डॉ.पंकज भोयर, विदर्भ संघटनमंत्री डॉ.उपेन्द्र कोठेकर यांच्यासह प्रदेश पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान, निवडणूक महायुती एकत्र लढेल का असा प्रश्न विचारला असता, शक्य तिथे महायुतीतच लढण्याचे संकेत फडणवीस यांनी दिले -

*(होल्ड बाईट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस)*

*आमचा प्रयत्न आहे की महायुती म्हणून लढायच  जिथे शक्य आहे तिथे आम्ही सोबत लढू जिथे शक्य होणार नाही, तिथे मैत्रीपूर्ण लढत करू, मैत्रीपूर्ण लढती हा नियम नाही आहे महायुती हा नियम आहे. मैत्रीपूर्ण लढत हा अपवाद आहे काही ठिकाणी तो होईल, काही ठिकाणी नाही होणार .*

दरम्यान, लाडकी बहीण योजनेबाबत विचारले असता महिला आणि बालविकास मंत्रालयाला 26 लाख निकषात न बसणारी खाती आढळल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. सध्या हे सगळे खाते रद्द केले नसून या सर्वांची पुन्हा एकदा शहानिशा केली जाईल आणि निकशात न बसणारे खाते बंद केले जातील अशी माहिती त्यांनी दिली.

---------------------------------------------

बीएसएनएल

बीएसएनएल अर्थात भारत संचार निगम लिमिटेडला,२०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत २६०, तर चौथ्या तिमाहीत २८० कोटी रुपयांचा निव्वळ नफा झाला आहे. केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी आज वार्ताहरांना ही माहिती दिली. बीएसएनएलच्या सहकार्यानं दूरसंचार विभागानं आयोजित केलेल्या दोनपैकी पहिल्या उच्चस्तरीय आढावा बैठकीनंतर ते बोलत होते.

---

अनियमितता

भंडारा जिल्ह्यात अनियमितता आढळलेल्या चार कृषी सेवा केंद्रांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. जिल्हा भरारी पथकाने कृषी सेवा केंद्रांची अचानकपणे तपासणी केली असता, चार केंद्रात प्रत्यक्ष युरिया खतसाठा आणि पॉश मशीनवरील खतसाठा जुळत नसल्याचं लक्षात आल्यानं ही कारवाई करण्यात आली. तर तपासणीत दोषी आढळलेल्या ३१ कृषी केंद्रांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

---

महायुती सहकार पॅनल

भंडारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत महायुती सहकार पॅनल विजयी झालं असून, तेरा उमेदवार निवडून आले आहेत. नाना पटोले यांच्या परिवर्तन शेतकरी पॅनलला दारुण पराभव पत्करावा लागला असून, त्यांचे केवळ तीन उमेदवार निवडून आल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

---

संसद -ऑपरेशन सिंदूर

ऑपरेशन सिंदूर स्थगित केलेलं आहे, संपलेलं नाही. पाकिस्तानने भविष्यात कोणतीही आगळीक केली, तर ऑपरेशन सिंदूर पुन्हा सुरू होईल, अशी ग्वाही संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी आज लोकसभेत ऑपरेशन सिंदूरवरच्या चर्चेच्या प्रारंभी दिली. या कारवाईत भारताच्या सेनादलांनी पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधले ९ दहशतवादी तळ लक्ष्य केले. यापैकी ७ तळ पूर्णपणे उद्ध्वस्त झाले. यात १०० पेक्षा जास्त दहशतवादी ठार झाल्याचा अंदाज असल्याची माहिती त्यांनी सभागृहाला दिली. ऑपरेशन सिंदूरचं उद्दिष्ट दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त करणं आणि दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानला धडा शिकवणं आणि दहशतवादाप्रति भारताचं कठोर धोरण अधोरेखित करणं हे होतं, कोणत्याही युद्धाला तोंड फोडण्याचा यामागचा हेतू नव्हता, असं प्रतिपादन त्यांनी केलं. भारताच्या प्रत्युत्तरामुळे १० मे रोजी पाकिस्तानने हार मानली आणि शस्त्रसंधी करण्याचा

प्रस्ताव ठेवला, असं सांगून ऑपरेशन सिंदूरसाठी ठरवलेली राजकीय आणि लष्करी उद्दिष्टं पूर्ण झाल्यामुळे ही कारवाई थांबवण्यात आली, कोणाच्याही दबावामुळे शस्त्रसंधी केल्याचे आरोप पूर्णपणे चुकीचे आणि निराधार असल्याचं सिंह यांनी नमूद केलं.

---------------------------------------------

प्रताप सरनाईक

राज्य सरकार मराठी तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी अप्र आधारित प्रवासी वाहनसेवा सुरू करण्याच्या विचारात असुन प्रवासी वाहतुकीसाठी अप्र आधारित रिक्षा,टक्सी आणि ई-बाईक सेवा आता खासगी कंपन्यांपुरती मर्यादित न राहता, परिवहन विभागाच्या सहकार्याने सुरू करण्यात येणार आहे. या ॲप ला जय महाराष्ट्र, महा - राईड, महा-यात्री, महा-गो यापैकी एखादे नाव देणे प्रस्तावित आहे. अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या अंतिम मान्यतेने सदर शासकीय ॲप लवकरच कार्यान्वित होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या उपक्रमाअंतर्गत अप्र विकसित करण्यासाठी ‘महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सपोर्ट टेक्नॉलॉजी’ आणि ‘मित्र’ या संस्थेसह खासगी कंपन्यांशी चर्चा सुरू करण्यात आली आहे. यंत्रणेत पारदर्शकता ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबींचा समावेश यात असून लवकरच अप्र तयार होणार असल्याचं मंत्री सरनाईक यावेळी म्हणाले. या माध्यमातून मराठी तरुण- तरुणींना विशेष आर्थिक पाठबळ देण्यात येणार आहे. बेरोजगार तरुण-तरुणींना रोजगार देण्यासाठी मुंबई बँकेच्या माध्यमातून वाहन खरेदीसाठी १० टक्के व्याजदराने कर्ज दिले जाणार आहे. अशी ग्वाही मुंबै बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर यांनी दिली.

---------------------------------------------

श्रावणी सोमवार

पहिल्या श्रावणी सोमवारनिमित्त राज्यातल्या ज्योतिर्लिंग असलेल्या शिवमंदिरांमध्ये आज पहाटेपासूनच भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली आहे. नागपुरातील महाल इथल्या पूरातन कल्याणेश्वर मंदिर येथे भाविकांनी सकाळ पासनच पूजा, अभिषेक करण्यासाठी आणि दर्शनासाठी गर्दी केल्याचे आमच्या प्रतिनिधीने सांगितले. अकोला जिल्ह्यात गांधीग्राम इथं श्री राजराजेश्वर मंदिराजवळ कावडधारी भाविकांनी अभिषेकासाठी पूर्णा नदीचं पाणी आणण्यासाठी कालपासूनच गर्दी केली आहे. अनुचित प्रकार टाळण्यासाठी नदीपात्रात महसूल विभागातर्फे बचाव पथक आणि पोलीस दल तैनात करण्यात आलं होते.

-------------------------------------------

शुभांगी भडभडे निधन

सुप्रसिद्ध लेखिका, ज्येष्ठ कादंबरीकार शुभांगी भडभडे यांचे आज सकाळी नागपूर येथे निधन झाले. त्यांच्या निधनाने वैदर्भीय साहित्यसृष्टीत शोककळा पसरली आहे. वयाची ८० वर्षं पूर्ण झाल्यानंतरही सातत्याने लेखन करणाऱ्या शुभांगी भडभडे यांनी सुमारे ८० कादंबऱ्या, दोन कथासंग्रह, तसेच वैचारिक लेखन करत मराठी साहित्यात मोलाची भर घातली. विशेषतः चरित्रात्मक कादंबरी हे त्यांचे लेखनविशेष राहिले. त्यांच्या निधनाबद्दल केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आमदार संदीप जोशी यांनी शोक व्यक्त केला आहे.

-------------------------------------------

एफआयएसयू

जर्मनीत झालेल्या FISU जागतिक विद्यापीठ क्रीडा स्पर्धांमधे भारतानं एकंदर १२ पदकांची कमाई केली. यात २ सुवर्ण, ५ रौप्य आणि ५ कांस्यपदकांचा समावेश आहे. शेवटच्या दिवशी अंकिता ध्यानी हिनं महिलांच्या तीन हजार मीटर अडथळ्यांच्या शर्यतीत रौप्यपदक पटकावलं, तर पुरुषांच्या रिले आणि महिलांच्या रेस वॉक संघांनी दोन कांस्यपदकं भारताला मिळवून दिली. स्पर्धेच्या पदकतालिकेत भारत २०व्या स्थानावर राहिला. जपाननं ३४ पदकांसह पहिलं स्थान मिळवलं, तर अमेरिका २८ सुवर्णपदकांसह दुसऱ्या स्थानी राहिली.

-------------------------------------------

हवामान

उद्या आणि परवा नागपूर सह विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमान राहणार असल्याचा इशारा नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्राने दिला आहे. उद्या नागपूर भंडारा वर्धा चंद्रपूर आणि अमरावती इथं विजांच्या कडकडाटासह ढगाळ वातावरण राहू शकते. तर परवा 30 जुलै रोजी संपूर्ण विदर्भातच अशा प्रकारचे वातावरण राहण्याची शक्यता आहे.

-------------------------------------------